# नामजप : संकल्प आणि सिद्धी

प. पू. श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी

या सृष्टीतून प्रथम उत्पन्न झाला तो नाद आणि या नादातूनच सर्व विश्वाची निर्मिती झाली. या नादाचं आपल्यासमोरील वस्तुनिष्ठ रूप म्हणजे नाम. त्यामुळेच दृश्यातून अदृश्याकडे आणि सगुणातून निर्गुणाकडे वाटचाल करण्यासाठी नामसंकीर्तन ही साधना आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात सांगितली आहे. वैदिक काळापासून 'यज्ञ, दान, तप, कर्म' अशी जी चतु:सूत्री साधना सांगितली गेली आहे, त्यातल्या तपसाधनेचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे 'नामस्मरण.' या नामसाधनेला स्थल, काल किंवा इतर कोणतंही बंधन नाही. समर्थांनी तर स्पष्टपणे सांगितलं आहे,

चहु वर्णा नामाधिकार। नामी नाही लहान थोर।
जड मूढ पैलपार। पावती नामे ।।

या विश्वाच्या सर्व व्यापाराचं संचालन करणारी जी वैश्विक शक्ती आहे, त्या शक्तीला आर्त स्वराने, अतिशय करुणामय अशी हाक मारणं म्हणजे नामस्मरण भक्ती आणि अशी जो हाक मारतो तो भक्त. नुसत्या स्मरणाने ही वैश्विक शक्ती भक्तापुढे हजर होते, म्हणून या शक्तीला 'स्मर्तृगामी' हे विशेषण लावले जाते. एखाद्या शास्त्रसंमत नामाचे किंवा सद्गुरूंनी दिलेल्या नामाचे संकल्पपूर्वक पठण करणे म्हणजे नामजप. वैयक्तिक पातळीवर हा नामजप केला जाऊ शकतो. पण एकत्र येऊन या नामाचे सामूहिक पठण जेव्हा केले जाते तेव्हा त्याद्वारे फार मोठ्या शक्तीची निर्मिती होते. हेच पठण जेव्हा सद्हेतुपूर्वक प्रज्वलित केलेल्या अग्नीसमोर केले जाते तेव्हा त्याला यज्ञ असे म्हणतात.

सद्गुरु जेव्हा एखाद्या भक्ताला किंवा भक्तांच्या समूहाला विशिष्ट नामजपाची सामूहिक साधना करायला सांगतात तेव्हा ती साधना करण्याचा निश्चय करणं हे त्या प्रत्येक भक्ताच्या हिताचं असतं. या निश्चयाला अध्यात्मात 'संकल्प' असं म्हणतात. संकल्प या शब्दाची जर आपण फोड केली तर 'सं' हे अक्षर 'सत्य' हा अर्थ ध्वनित करतं तर 'कल्प' म्हणजे कल्पना. त्यामुळे संकल्प म्हणजे 'सत्याची कल्पना' किंवा 'सत्याचा निश्चय.' जीवनात जे शाश्वत आहे, चिरंतन आहे ते साध्य करण्यासाठी केलेला निश्चय म्हणजे सत्याचा निश्चय. या दृश्य प्रपंचात शाश्वत काहीच नाही, सर्व परिवर्तनीय आहे, केवळ परमार्थ शाश्वत आहे. परमार्थातील या शाश्वत तत्त्वाला, त्या अंतिम सत्याला प्राप्त करून घेण्यासाठी केलेले कर्म म्हणजे सत्कर्म. नामजपासारखे उत्तम आणि सोपे सत्कर्म अन्य नाही. म्हणूनच नामजपाच्या सत्कर्माचा संकल्प प्रत्येक साधकाने करणे आवश्यक आहे.

**डोंगराएवढा संकल्प :**

बरेच वेळा नामजपाचा संकल्प संख्येने मोठा असतो, अगदी कोटींच्या घरात असतो. त्यामुळे हा संकल्प प्राथमिक अवस्थेत फार मोठा भासतो जणु काही एखादे एव्हरेस्टचे शिखर आपल्यासमोर उभे आहे आणि आपण त्याच्या तळाशी उभे आहोत. आपण खालूनच त्या डोंगराकडे बघतो आणि म्हणतो की, एवढा मोठा डोंगर आपण कसे चढणार? तर असं नुसतं म्हणत बसलो तर काहीही होणार नाही. 'हा डोंगर मला चढायचा आहे आणि मी तो चढणार आहे' असा जेव्हा आपण निश्चय करतो आणि चालायला सुरुवात करतो तेव्हा त्याला संकल्प असे म्हणतात. मग एक एक पाऊल आपण पुढे चालायला लागतो.

जसजसे एक एक पाऊल पुढे पडायला लागते तसतसा तो डोंगर लहान लहान होत जातो. एक वेळ अशी येते की आपण त्या डोंगराच्या शिखरावर असतो आणि तो डोंगर आपल्या पायाखाली असतो. असा हा सत्कर्माचा डोंगर निश्चयाने पार करणे आवश्यक असते. कदाचित आपली पावलं मुंगीसारखी लहान लहान असतील. पण काय हरकत आहे? चालायला सुरुवात ही केलीच पाहिजे. कारण मुंगी तिच्या लहान पायांनी जरी चालत असली तरी ती कधी तरी डोंगर निश्चित चढणार. मग भले वाटेत खड्डे येतील, पाणी

येईल किंवा आणखीन काही संकटे येतील. जीवन म्हणजे संकटे येणारच. मी नामजप करतो म्हणजे मला काहीही होता कामा नये असे कोणी म्हणू नये. या अपेक्षेने सत्कर्म करायचे नसते. जे घडायचे ते आपोआप घडेल. संकल्पपूर्वक जर सत्कर्म करीत राहिलात तर सगळी संकटे दूर होतील आणि एक दिवस तुम्ही डोंगरावर उभे असाल आणि डोंगर तुमच्यापेक्षा लहान असेल.

हे सगळं कशासाठी करायचं? असे जर कोणी म्हणेल तर लक्षात घ्यावे की हे केवळ आपलीच पत वाढावी म्हणून करावे! कुठलेही कष्ट केल्याशिवाय, जीवनात सुखासुखी पत वाढत नाही. जे व्यवहारात आहे, तेच अध्यात्मातही आहे. अध्यात्मात निराळा नियम नाही. तिथेसुद्धा पत वाढवायची असेल तर अविरत तप केले पाहिजे, कष्ट घेतले पाहिजेत. तप केल्याशिवाय पत वाढत नाही आणि पत वाढल्याशिवाय माणसाची प्रत सुधारत नाही. ही प्रत सर्व बाजूंनी सुधारण्यासाठी कितीही अडचणी आल्या तरी हा डोंगर चढायचाच आहे, हा निश्चय करून मार्गक्रमणा सुरू करणे याला अध्यात्मात संकल्प म्हणतात.

**संकल्पाचे वैरी :**

या संकल्पामध्ये आड येणाऱ्या गोष्टींपैकी महत्त्वाचे म्हणजे षड्रिपू! म्हणजे मुखाने नामस्मरण पण सोबत मत्सर, हेवेदावे, खोटा अहंकार हे सुद्धा सुरू राहिलं तर केलेले तप आपल्या खात्यावर जमा होत नाही. व्यावहारिक जगाप्रमाणे अध्यात्मातही प्रत्येकाचं एक पासबुक असतं. कोणाच्या पासबुकावर काय जमा आहे हे सत्पुरुषांना समजतं.

जीवनात जेव्हा या षड्रिपूंचं आधिक्य होतं, खोटा मत्सर, खोटा द्वेष, खोटा अहंकार निर्माण होतो, तेव्हा योग्य ते तप करूनही दुर्गुणांमुळे ते तप पासबुकात त्या प्रमाणात जमा होत नाही. 'मी अमुक केले, मी तमुक केले' असे म्हणणे म्हणजे पोकळ दर्पोक्ती आहे कारण करणारे आपण कोणी नसतो. तो ईश्वर आहे म्हणून कृती घडते आहे याचे भान नेहमी ठेवावे. मी केले असे म्हणण्याआधी आपला अधिकार काय, आपली शक्ती काय आहे हे जरूर तपासून पहावे.

सत्कर्म करून घेणारेही गुरुतत्त्वच असते, म्हणूनच तपाचे साध्य प्राप्त करण्यासाठी हा खोटा अहंकार, हेवेदावे, मत्सर हे सगळे विसरून जायला हवे. वस्तुत: या मार्गामध्ये वरदानही मिळत राहते, पण तिथेसुद्धा हा मत्सर आड येतोच.

एक म्हातारा, म्हातारी आणि एक मुलगा होते. म्हातारा मत्सरी, द्वेष करण्याचा स्वभाव असलेला होता तर म्हातारी कष्टाळू आणि मुलगा मूर्ख अशी तिघांची तीन रूपे होती. एके दिवशी तिघेजण शेजारच्या गावात श्राद्ध पक्षाला निघाले. रस्ता जंगलातून जात होता आणि तिघांना त्या गावी जाऊन, जेवण करून परत यायचं होतं. पूर्वीच्या तपश्चर्येमुळे जंगलामध्ये त्यांना ईश्वर प्रसन्न झाला आणि म्हणाला, ''मी तुमच्यावर प्रसन्न आहे. काय पाहिजे ते मागा, प्रत्येकाला एक एक वरदान मिळेल.'' आता म्हाताऱ्याचा संशयी स्वभाव आड आला. त्याने विचारायला सुरुवात केली, ''कशावरून तू ईश्वर आहेस? काही ओळख वगैरे आहे का तुझ्याकडे? कशावरून मी तुला ईश्वर मानायचं? मला आत्ता जेवणाचं निमंत्रण आहे, तेव्हा मी प्रथम तिथे जाऊन येतो आणि आल्यावर काय ते वरदान वगैरे बघू! मग तो म्हातारा श्राद्धाचं जेवण करायला निघून गेला आणि म्हातारी व मुलगा दोघे उरले. म्हातारी कष्टाळू होती, दिवसभर काम करूनही वृद्धापकाळामुळे तिचे काम पूर्ण होत नसे. तेव्हा ती ईश्वराला म्हणाली, ''ठीक आहे, मला मान्य आहे की तू ईश्वर आहेस. मला कष्ट झेपत नाहीत. दिवसेंदिवस हे घर सांभाळणं कठीण होत चाललं आहे. तेव्हा तू मला वरदान दे. तू मला तरुण कर, ज्यामुळे मला हे कष्ट करता येतील.'' ईश्वर म्हणाला, ''तथास्तु!'' झालं तत्काळ ती स्त्री तरुण झाली.

तेवढ्यात जेवण करून तो म्हातारा तिथे परत आला. त्याने बघितलं की आपली बायको एकदम तरुण झाली आहे. मत्सर आणि द्वेषाच्या स्वभावामुळे त्याला वाटलं की हिचं मन काही ठीक नाही. पापाच्या उद्देशानेच तिने तरुण होण्याचं वरदान मागितलं असणार. मग त्याने ईश्वराला सांगितलं की, ''तू मला वरदान देणार होतास ना? मग एक काम कर, ही माझी बायको पापाच्या उद्देशानेच तरुण झाली आहे. तर तिला एकदम लहान कर, अगदी बोटाएवढी कर. फार शेफारली आहे, मी हा असा म्हातारा आणि ही अशी तरुण! एकदम लहान करून टाक हिला.'' ईश्वराने 'तथास्तु' म्हटल्यावर ती स्त्री एकदम लहान झाली. ते बघून तिचा वेडसर तरुण मुलगा एकदम रडायला लागला. ''हे काय झालं माझ्या आईचं?'' असे म्हणून त्याने ईश्वराला सांगितलं, ''माझ्या आईला परत होती तशी कर.'' झालं क्षणार्धात ती परत होती तशी म्हातारी झाली. एकूण काय, मत्सर, द्वेष आणि मूर्खपणा यामुळे ते कुटुंब आहे तिथेच राहिले आणि वरदान मिळूनही काही उपयोग करून घेता आला नाही. हात मोकळेच राहिले.

**आत्मशोधन करा :**

नामजपाची साधना करताना साधकाने मत्सर, द्वेष सोडून देणे

गुरुतत्त्वाला अभिप्रेत असते, कारण लोकांचा द्वेष, मत्सर केल्याने सगळं तप फुकट जातं. अनेक माळा ओढल्या तरी पदरात काहीच पडत नाही. या संदर्भात एक दोहा आहे,

माला तो करतल फिरे, जीह फिरे मुखमायी।
मन तो दशदिशी फिरे, यह तो सुमिरन नाही।।

जपमाळ हातात फिरते आहे आणि जीभ तोंडात फिरते आहे, पण नावापुरतंच, कारण मनात मात्र सततचे चक्र, 'हा माझ्यापुढे गेला, हा मागे राहिला, माझ्या घरी असं चाललंय, बाहेर असं चाललंय' हाच विचार आहे. या अशा तपाचा काही उपयोग नाही. मग 'मी २५ वर्षे साधना करतो आहे' असे नुसते सांगण्यापुरते उरते. कारण साधना अशा चुकीच्या पद्धतीने केली असेल तर तिचा काहीच उपयोग नाही. हेच संत कबीरांनी वेगळ्या शब्दात सांगितले आहे.

तन कहे राम, मन कहे आराम।
तन मन के झगडे में, ना मिले राम ना आराम।।

तन आणि मनाने एकत्रितपणे सत्कर्माचा संकल्प पूर्ण करायचा असतो, हे सगळे केवळ पुस्तके वाचून साधणार नाही तर त्यासाठी आत्मशोधन करून कृतीत उतरवले, तर त्याचा परमार्थात उपयोग होईल.

सद्गुरूंनी सांगितलेली नामस्मरणाची, नामजपाची साधना तुम्हाला तेव्हाच शक्तिरूप फळ देते, जेव्हा तुम्हाला ती शक्ती घ्यायची इच्छा असते. शक्ती ही देणाऱ्यापेक्षा घेणाऱ्यावर अवलंबून असते. श्रीकृष्ण कंसाला शक्ती देऊ शकले नाहीत कारण त्याची घ्यायची इच्छा नव्हती. श्रीराम रावणाला शक्ती देऊ शकले नाहीत कारण रावणाची घ्यायची इच्छा नव्हती. तो योगेश्वर एवढा महान होता की, सगळ्या जगाचे कल्याण करण्याची ताकद त्याच्याकडे होती. मग त्याने अर्जुनाचं कल्याण केलं आणि दुर्योधनाचं केलं नाही, असं का? कारण त्यालाही ही मर्यादा आहेच.

हे निसर्गाचे नियम आहेत. अहंकारशून्य होऊन एखाद्या शक्तीपुढे शरण गेल्याशिवाय, ती शक्ती मिळतच नाही. देणाऱ्याने द्यायची इच्छा कितीही मनापासून व्यक्त केली तरी मिळत नाही कारण नुसती घेण्याची इच्छा व्यक्त करून उपयोग नाही, तद्नुरूप कृतीसुद्धा हवी. घेण्यासाठी तुम्ही फाटकी झोळी घेऊन गेलात किंवा अहंकाराची छिद्रं असलेली चाळण घेऊन गेलात तर दिलेलं सगळं गळून जाणार, व्यर्थ जाणार! या सगळ्याचं आत्मशोधन करून, मग हा सत्याचा संकल्प, म्हणजे नामजपाचा संकल्प करणे आवश्यक असते.

**समाजाच्या कल्याणासाठी सामूहिक जप :**

सत्पुरुष जेव्हा नामजपाचा सामुदायिक संकल्प करतात, तेव्हा असा संकल्प ते स्वतःच्या कोणत्याही फायद्यासाठी करत नसतात. त्यांना स्वतःला त्यापासून काहीही मिळवायचं नसतं. कारण ते वैश्विक शक्तीशी इतके एकरूप झालेले असतात की, आणखी काही प्राप्त करण्याची आवश्यकताही त्यांना नसते. मग हे संकल्प कशासाठी केले जातात? तर सामान्य भक्ताच्या हितासाठी. मग तो मुमुक्षू असो अथवा सिद्ध अवस्थेकडे वाटचाल करणारा साधक असो. सत्पुरुषांनी जे नाम दिलेले असते, त्या नामामागे त्या सत्पुरुषाची शक्ती असते. असं नाम संकल्पपूर्वक घेत राहिल्याने, सर्व भक्तांचं फार मोठं कल्याण होतं, कारण समुदायाने केलेल्या नामजपामध्ये फार प्रचंड शक्ती निर्माण होते.

सगळ्या षड्विकारांना काबूत ठेवून जेव्हा आपण नामजपाचा संकल्प करतो, तेव्हा तो निश्चितच कल्याणप्रद असतो. इथे क्षुद्र प्रापंचिक कल्याण अपेक्षित नाही. ते तर आपोआप साध्य होतेच, पण अंतिम साध्य पारमार्थिक कल्याण आहे. प्रत्येक संकल्पामागची इच्छा तीच असावी. विज्ञान असे सांगते की, शरीरातल्या सगळ्या पेशी ७ ते ११ वर्षात बदलून जातात. या पेशी पेशीमध्ये जेव्हा नि:स्वार्थपूर्वक नामजप ओतला जातो, तेव्हा सबंध पेशी, सगळे शरीर, त्यानंतर अदृश्य मन, चित्त हे सगळं आपोआप शुद्ध व्हायला लागतं. पण त्याला हा किमान कालखंड आणि या आधी सांगितलेल्या अटी आहेत.

आपल्याला प्रापंचिक अडचणी असणारच, पण त्यांचं निवारण होईल. या अडचणींचा बाऊ न करता, राईचा पर्वत न करता संकल्प पार पाडला पाहिजे. नुसता निश्चय करून त्याच्यातून मागे फिरणे योग्य नाही. विज्ञान असे म्हणते की, मनुष्य जेव्हा एखादा संकल्प करतो, तेव्हा या संकल्पाचे संस्कार शरीरातल्या पेशींवर होतात. नंतर तोच मनुष्य जेव्हा त्या संकल्पापासून क्षुद्र प्रापंचिक गोष्टींमुळे परावृत्त होतो किंवा ती साधना विसरतो आणि संकल्पपूर्तीचा प्रयत्न करीत नाही, तेव्हा पेशींवर झालेले संस्कार त्याला सतत त्या संकल्पाचे स्मरण करून देतात आणि मग हा संघर्ष मनामध्ये रुखरुख निर्माण करतो. सततच्या क्षुद्र प्रापंचिक लोभामुळे मनुष्य त्याकडे दुर्लक्ष करतो. त्यातच साध्य आणि साधन याची दुर्दैवाने गल्लत होते आणि मनुष्याचा घात होतो.

दोन निद्रानाशाचे रोगी होते. त्यांना कोणीतरी सांगितले

...पान ६० वर

# योगवासिष्ठ – उत्पत्ती प्रकरण : मनाचे स्वरूप

प्रा. प्र. श्री. डोरले

**पूर्वसंदर्भ –** उत्पत्ती प्रकरणाचा संबंध उत्पत्ती प्रक्रियेची देवता असलेल्या ब्रह्मदेवाशी आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश या देवता उत्पत्ति, स्थिती आणि लय या त्रिविध अवस्थांच्या 'कारण देवता' समजल्या जातात. श्रीवसिष्ठांनी 'आकाशज विप्राच्या' आख्यानातून, रूपककथेतून ब्रह्मदेवाचे स्वरूप वर्णन करून सांगितले. त्या निमित्ताने अनेक संकल्पना स्पष्ट केल्या.

१) ज्ञानाशिवाय दृश्यनिरासाचा दुसरा कोणताही उपाय नाही.

२) मृत्यूला वश होण्यासाठी मनुष्याचे कर्मच अधिकांशाने कारणीभूत असते.

३) ब्रह्मदेव हा प्रारब्ध, क्रियमाण आणि संचित याच्या अतीत आहे. तो चिद्रूप आहे म्हणून स्वयंभू आहे.

४) ब्रह्मदेवाचा देह हा शुद्ध सत्त्वमय आहे. त्यालाच 'आतिवाहिक' देह असे म्हणतात.

५) सृष्टीच्या विकासाला चिद्रूप असलेला ब्रह्मदेवच कारणीभूत आहे. त्याच्या मानसिक संकल्पातून ही सृष्टी उत्पन्न झाली आहे. (एकोऽहं बहुस्याम्) त्यामुळे ही सृष्टीदेखील 'मनोमय'च आहे.

याप्रमाणे सृष्टीच्या उत्पत्तीबद्दलची व त्या प्रक्रियेशी संबंधित असणारी तत्त्वज्ञानाची वा तात्त्विक सूत्रांची मांडणी वसिष्ठ मुनींनी केली. वसिष्ठ मुनींचे हे गूढ व रहस्यमय विवेचन ऐकल्यावर श्रीरामप्रभूंनी त्यांना 'मनाविषयी'एक महत्त्वाचा प्रश्न विचारला.

**श्रीरामांचा प्रश्न–मनाचे स्वरूप कसे आहे?–** ब्रह्मदेवाच्या मानसिक संकल्पापासून ही मनोमय सृष्टी निर्माण झाली आहे. त्यामुळे ज्या मनापासून या सर्व जगताची उत्पत्ती होते त्याचे तात्त्विक स्वरूप कशा प्रकारचे आहे असा प्रश्न श्रीरामाने विचारल्यावर श्रीवसिष्ठांनी त्याबद्दल विवेचन करताना म्हटले की, ''मनाचे प्रत्यक्ष असे स्वरूप काहीही सांगता येणार नाही कारण बाह्य जगात किंवा आपल्या हृदयात 'मन' म्हणून काही सत्स्वरूपी वस्तूच नाही. मन हे केवळ एक भास आहे. मृगजळामध्ये जसा पाण्याचा भास होतो त्याप्रमाणे या मनापासून जग उत्पन्न झाले आहे. संकल्पामुळे मनोरूपी भ्रम उत्पन्न होतो. सत् किंवा असत् वस्तूच्या आकाराचा जो भास उत्पन्न होतो तेच मन होय. याशिवाय मन म्हणून काही निराळे नाही. संकल्प म्हणजेच मन होय. ज्या ठिकाणी संकल्प आहे त्याच ठिकाणी मन आहे. तसेच ज्या प्रकारचा संकल्प आहे त्या प्रकारचे मनाचे स्वरूप हा नियम आहे कारण संकल्प आणि मन याबाबतीत भिन्नपणा नाही.

रामास्य मनसो रूपं न किंचिदपि दृश्यते।
नाममात्रादृते व्योम्नो यथा शून्यजडाकृतेः।।
न बाह्ये नापि हृदये सद्रूपं विद्यते मनः।
सर्वत्रैव स्थितं चैतद्विद्धि राम यथा नभः।।
इदमस्मात्समुत्पन्नं मृगतृष्णाम्बुसंनिभम्।
रूपं तु क्षणसंकल्पाद्वितीयेन्दुभ्रमोपमम्।।
संकल्पनं मनो विद्धि संकल्पात्तन्न भिद्यते।
यथा द्रवत्वात्सलिलं तथा स्पन्दो यथानिलात्।।
यत्र संकल्पनं तत्र तन्मनोऽङ्गं तथा स्थितम्।
संकल्पमनसी भिन्ने न कदाचन केचन।।

मनाचे स्वरूप स्पष्ट करताना श्री वसिष्ठ रामाला म्हणतात, ''हे रामा! सत्य किंवा असत्य पदार्थाचे भासणे हेच मन आहे. ब्रह्मदेव म्हणजे समष्टिरूप मनच होय. आतिवाहिक देह म्हणजेच मन आहे असे समज. तेच भौतिक स्वरूपात परावर्तित झाले म्हणजे त्यामधूनच या दृश्य जगाचा पसारा निर्माण होतो. या दृश्य जगाला अविद्या, संसार, चित्त, मन, बंध, मल, तम, सृष्टी इत्यादी विविध नावांनी संबोधिले जाते. पण वस्तुतः हे दृश्य जग स्वतंत्रपणे अस्तित्वातच नाही असे तू समज. कमलबीजामध्ये संपूर्ण कमळाचे अस्तित्व असते त्याप्रमाणे चैतन्यरूप परमाणूमध्ये हे दृश्य जग आहे. ज्याप्रमाणे प्रकाशाचा धर्म प्रकाशत्व, वायूचा धर्म चंचलता, पाण्याचा

नावे दिली जातात त्याप्रमाणे मन हे निरनिराळी कर्मे करू लागली म्हणजे ते निरनिराळी नावे धारण करते.'

या मनालाच कार्यभिन्नतेमुळे मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार या विविध नावांनी संबोधिले जाते. या मनाच्या स्वरूपाविषयी अनेकांची अनेक मते आहेत. पण केवळ तर्काधिष्ठित असलेल्या त्या मतांशी वसिष्ठ सहमत नाहीत. ब्रह्मर्षी वसिष्ठ म्हणतात, 'आमचा सिद्धांत हा श्रुतीच्या अनुभवसिद्धतेवर आधारित आहे.

उर्णनाभाद्यथा तंतुर्जायते चेतनाज्जड: ।
नित्यप्रबुद्धात्पुरुषात् ब्रह्मण: प्रकृतिस्तथा ।।

म्हणजे, 'चेतन अशा कोळ्यापासून जडतंतू उत्पन्न होतात त्याप्रमाणे नित्यज्ञान पुरुषापासून (ब्रह्मापासून) प्रकृती उत्पन्न होते म्हणजे मन उत्पन्न होते' असा श्रुतींचा ठाम सिद्धांत आहे.

**मन जड का चेतन?**– मन जड आहे का चेतन आहे हा वाद अनेक मीमांसकांमध्ये, चिंतकांमध्ये, विचारवंतांमध्ये व विज्ञानवाद्यांमध्ये आहे. काहींचे म्हणणे ते सूक्ष्म असले तरी जडच आहे. तर काहींच्या मते त्याच्या गतीमुळे, कार्यकलापांमुळे ते चेतन आहे. मनाच्या बाबतीत या दोन्हीही कल्पना व्यक्तिसापेक्ष आहेत.

ज्यांचे मन वासना-विकार मलाने, मलीन झालेले असते त्यांचे मन जड असल्याचा त्यांना अनुभव येतो. तर ज्यांचे मन साधनेने, तपश्चर्येने वासनारहित झालेले असते त्यांना ते चेतन असल्याचा अनुभव येतो. या संबंधातील वसिष्ठांचे विवेचन अतिशय सूक्ष्म, शास्त्रीय आणि विज्ञाननिष्ठ आहे. ते अधिकारवाणीने म्हणतात,

न चेतनं न च जडं यदिदं प्रोत्थितं मन: ।
अजडं हि मनो राम संसारस्य न कारणम् ।।
जडं चोपलधर्मापि संसारस्य न कारणम् ।
न चेतनं न च जडं तस्माज्जगति राघव ।।
मन: कारणमर्थानां रूपाणामिव भासनम् ।।

म्हणजे, 'वास्तविक हे निर्माण झालेले मन चेतन नाही व जडही नाही कारण चेतन मन ब्रह्मरूप असल्यामुळे संसाराचे कारण केव्हाच होत नाही. तसेच दगडासारखे जड मनही संसाराचे कारण होऊ शकत नाही. नुसते जड वा नुसते चेतन मन हे संसारातील विषयांना प्रकाशित करीत नसून ते जेव्हा जड व चेतनात्मक बनते तेव्हाच ते या संसाराचे कारण होते.' त्या संदर्भात ठामपणे ते प्रभु रामचंद्रांना सांगतात की,

जडाजडं मनो विद्धि संकल्पात्म बृहद्वपु: ।
अजडं ब्रह्मरूपत्वाज्जडं दृश्यात्मतावशात् ।।

यास्तव मन जड चेतनात्मक आहे आणि संकल्प करीत राहणे हा त्याचा स्वभाव आहे. ब्रह्मरूप असल्यामुळे ते चेतन आहे आणि दृश्य विषयाशी तद्रूप होते म्हणून ते जडही आहे.

याप्रमाणे मनाचे स्वरूप वसिष्ठांनी अगदी स्पष्टरूपाने, सूक्ष्मपणे योगवासिष्ठात मांडले आहे. योगवासिष्ठाइतके मनाचे विवेचन इतर ग्रंथात क्वचितच आढळून येते. हे नुसते विवेचन नाही तर त्याला तपश्चर्येतून प्राप्त झालेल्या अनुभूतीचा दिव्य व संजीवक स्पर्श आहे. या मनाचे सामर्थ्य अपार आहे. त्याचेही सविस्तर व विस्तृत वर्णन या ग्रंथात केले आहे. त्याचा मागोवा आपण पुढील लेखात पाहू.

क्रमश:

---

पान ५५ वरून... नामजप : संकल्प आणि सिद्धी

की, अमुक साधना करा, मग तो ईश्वर प्रसन्न होईल, त्याला मागा काय मागायचं ते! त्या दोघांनीही ते तप केलं आणि दोघांनाही ईश्वर प्रसन्न झाला. ईश्वराने सांगितलं, ''मागा काय वरदान मागायचं असेल ते.'' पहिल्या माणसाने सांगितलं, ''मला उत्तमपैकी सोन्याचा पलंग दे, छान सावरीच्या कापसाची गादी दे'' दुसऱ्याने मात्र सांगितले की, ''मला असे वरदान दे की, मी कुठेही झोपलो तरी मला झोप लागेल. जमिनीवर असो, झाडाखाली असो, कुठेही झोप लागणं महत्त्वाचं आहे.'' हा दुसरा खरा हुशार! त्या सोन्याच्या पलंगाच्या गादीवर झोपून झोपच लागली नाही तर त्याचा काही उपयोग नाही हे सत्य त्याला समजले. सोन्याचा पलंग निद्रेचं सुख देईल, ही भ्रामक सुखाची कल्पना आहे. असा सोन्याचा पलंग नव्हे, तर खरोखरीच्या सिद्धीची अपेक्षा साधकाने केली पाहिजे. सिद्धी कसली? तर 'चुकवी चौऱ्यांशींचा फेरा' ही सिद्धी. या जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांपासून मुक्त होण्याची सिद्धी म्हणजेच मोक्षसिद्धी. अशी मोक्षाची सिद्धी नुसत्या प्रापंचिक मागण्या पुढे रेटून प्राप्त होणार नाही तर यासाठी सद्गुरुचरणाच्या साक्षीने, सगळ्या षड्रिपूंना काबूत ठेवून, तनाने आणि मनाने मी हा नामजपाचा संकल्प पार पाडेन आणि संकल्पापासून कुठल्याही संकटामुळे मागे फिरणार नाही असा निश्चय हवा.

(प. पू. सद्गुरु श्री. बापट गुरुजी यांनी ओम् सद्गुरु प्रतिष्ठान, बोरीवली येथे दिनांक १४ ऑक्टोबर २००४ रोजी दिलेल्या प्रवचनावर आधारित)